15 NOV 2022
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापुरात सोमवारी शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा (सिनेट) निवडणुकीत कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी मतदान केले. सायबर इन्स्टिट्यूट येथील केंद्रावर शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा (सिनेट) निवडणुकीत मतदान करण्यासाठी शिक्षक, नोंदणीकृत पदवीधरांची रांग लागली होती. (छाया : नसीर अत्तार)

# 'विकास आघाडी'ला बहुमत की; 'सुटा'ची मुसंडी; उद्या फैसला

## सिनेटसाठी ४० टक्के मतदान : १०० उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा (सिनेट), विविध अधिकार मंडळांसाठी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील एकूण ३३ केंद्रांवर सोमवारी सकाळी ९ ते सायंकाळी ५ यावेळेत चुरशीने, पण शांततेत मतदान झाले. अधिसभा व विद्यापीठ शिक्षक, नोंदणीकृत पदवीधर, विद्या परिषद शिक्षक, अभ्यास मंडळे या गटातील ५० जागांसाठी लढलेल्या १०० उमेदवारांचे भवितव्य मतपेटीमध्ये बंद झाले आहे. विविध पाच गटांतील एकूण ४३,००१ मतदानांपैकी १७,३७४ जणांनी मतदान केले. सरासरी ४० टक्के मतदान झाले. यात सर्वाधिक ९७.७१ टक्के मतदान अभ्यास मंडळे गटात झाले.

मतमोजणी बुधवारी (दि. १६) सकाळी ९ वाजल्यापासून विद्यापीठातील परीक्षा भवन दोनमध्ये होणार आहे. या निवडणुकीत विद्यापीठ विकास आघाडी यंदाही बहुमत मिळविणार की, सुटा आणि शिव-शाहू आघाडी मुसंडी मारणार याचा फैसला बुधवारी संध्याकाळपर्यंत होईल.

या दोन्ही आघाडींसह यंदा बहुरंगी लढत रंगली होती. विकास आघाडी, सुटाचे एकूण ६९ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. पाच गटांतील ५० जागांसाठी सोमवारी विविध ३३ केंद्रांवर सकाळी ९ वाजल्यापासून मतदानाची प्रक्रिया सुरू झाली. कोल्हापूर शहरातील डीआरके कॉमर्स कॉलेज, शहाजी कॉलेज, सायबर इन्स्टिट्यूट परिसरात सकाळी साडेआठ वाजल्यापासून उमेदवार, त्यांच्या समर्थकांची गर्दी होऊ लागली. विकास आघाडी आणि सुटा, शिव-शाहू आघाडीने मतदान केंद्रांबाहेर बूथ लावले होते. काहीवेळातच या केंद्रांचा परिसर गर्दीने फुलला. मतदान कक्षाबाहेर उमेदवार एका रांगेत थांबून मतदारांना आवाहन करीत होते.

साडेनऊ वाजल्यापासून मतदान कक्षाबाहेर रांगा लागल्या होत्या. दुपारी साडेतीनपर्यंत त्या कायम होत्या. आमदार हसन मुश्रीफ, आमदार जयंत आसगावकर, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी मतदान केले.

> प्राचार्य, संस्थाचालक, विद्या परिषद, अभ्या समंडळात आमचे ५४ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. शिक्षक, पदवीधर गटातही आम्हाला निश्चितपणे बहुमत मिळेल.
>
> **- डॉ. व्ही. एम. पाटील,** सहसचिव, विद्यापीठ विकास आघाडी

> शिक्षक, पदवीधर, अभ्यास मंडळे गटात आम्हाला मतदारांनी चांगला प्रतिसाद दिला आहे. यंदा या गटांमध्ये आम्ही जोरदार मुसंडी मारणार आहोत.
>
> **-डॉ. डी. एन. पाटील,** प्रमुख कार्यवाही, सुटा

### पदवीधर मतदानाचा टक्का घसरला

या निवडणुकीत ३६३४३ नोंदणीकृत पदवीधर मतदानासाठी पात्र ठरले. ती आतापर्यंतची विद्यापीठातील सर्वाधिक संख्या ठरली. मात्र, नोंदणीत आघाडीवर असलेले हे पदवीधर मतदान करण्यात पिछाडीवर राहिले. त्यांच्या मतदानाचा टक्का ३०.६३ इतका राहिला. गेल्या निवडणुकीतील मतदानाच्या तुलनेत त्यांचा टक्का १६.३७ ने घसरला. पदवीधरांना मतदान केंद्रापर्यंत आणण्यात दोन्ही आघाडींचे प्रयत्न कमी पडल्याचे त्यातून दिसून आले. अधिसभा शिक्षक, विद्या परिषद शिक्षक, अभ्यास मंडळातील मतदानाचा टक्का वाढला.

### यंदा मतदारसंघ (गट) निहाय मतदानाची टक्केवारी

| गट | एकूण | झालेले | टक्केवारी |
|---|---|---|---|
| अभ्यास मंडळे | ४३६ | ४२६ | ९७.७१ |
| विद्यापीठ शिक्षक | १६६ | १६० | ९६.३९ |
| विद्या परिषद शिक्षक | ३१११ | २९०८ | ९३.४७ |
| अधिसभा शिक्षक | २९४५ | २७४९ | ९३.३४ |
| नोंदणीकृत पदवीधर | ३६३४३ | ११९३१ | ३०.६३ |

### गेल्या निवडणुकीतील मतदान

९०% — अधिसभा आणि विद्या परिषद शिक्षक

९३% — विद्यापीठ शिक्षक

७८% — अभ्यास मंडळे

४६% — नोंदणीकृत पदवीधर

### नवोदितांचा गोंधळ उडाला...

पसंतीक्रमानुसार मतदानाची प्रक्रिया असल्याने नवोदित मतदारांचा काहीसा गोंधळ उडाला. उमेदवार, त्यांचे समर्थक, मतदारांमध्ये मोठा उत्साह दिसून आला.

15 NOV 2022
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




कोल्हापूर : अधिकार मंडळांच्या निवडणुकीत मतदानासाठी सायबर मतदान केंद्रामध्ये रांगेत थांबलेले कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. दुसऱ्या छायाचित्रात शिवाजी विद्यापीठ सिनेट सदस्यांसाठी सोमवारी मतदान झाले. (मोहन मेस्त्री : सकाळ छायाचित्रसेवा)

# सिनेटसाठी ३०.६२ टक्के मतदान

## शिवाजी विद्यापीठ; मतमोजणी उद्या, मतदारांना केंद्रापर्यंत आणण्याचे आव्हान

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १४ : शिवाजी विद्यापीठाच्या अधिकार मंडळांच्या (सिनेट) निवडणुकीत एकूण ३०.६२ टक्के मतदान झाले. नोंदणीकृत पदवीधरांच्या गटात मतदानाची टक्केवारी केवळ ३०.६३ इतकी राहिली. त्यातून मतदारांचा निरुत्साह प्रकर्षाने दिसून आला. बुधवारी (ता. १६) मतमोजणी होणार आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायद्यानुसार अधिसभा, विद्या परिषद व अभ्यास मंडळांसाठी ही निवडणूक झाली. अधिसभेच्या ३९, विद्या परिषद ८ व प्रत्येक अभ्यास मंडळांवर प्रत्येकी तीन सदस्य निवडणुकीत निवडले जाणार आहेत. त्यासाठी शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी व शिव-शाहू आघाडी एकमेकांविरोधात होती. नोंदणीकृत पदवीधर गटात ३६ हजार ३४३ मतदारांची नोंदणी झाली होती. त्या तुलनेत मतदान होईल, असा अंदाज होता. मात्र, गेल्या निवडणुकीप्रमाणेच या निवडणुकीतही मतदारांचा निरुत्साह जाणवला.

दोन्ही आघाड्यांकडून मतदारांना मतदान केंद्रांपर्यंत आणण्याचे आव्हान पेलावे लागले. सायबर मतदान केंद्रांवर गर्दीचा टक्का जादा दिसल्याने येथे मतदानाचा टक्का अधिक असेल, असा कार्यकर्त्यांचा अंदाज होता. मात्र, मतदान पूर्ण झाल्यानंतर त्यांच्या भ्रमाचा भोपळा फुटला. आघाड्यांतील कार्यकर्त्यांची गर्दी जमा झाल्याचे दिसून आले. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी काम पाहिले.

### २५ हजार २१२ मतदार गेले कोठे..?

नोंदणीकृत पदवीधरांच्या मतदान नोंदणीसाठी आघाड्यांनी जंगजंग पछाडले होते. तरीही मतदानाचा टक्का वाढला नाही. २५ हजार २१२ मतदार गेले कोठे, असा प्रश्न उपस्थित झाला. या मतदारांचे करायचे काय, अशी भावना कार्यकर्त्यांत दिसून आली.

### सायबर चौकात वाहतूक कोंडी

सायबर चौकात दोन्ही आघाड्यांनी शामियाना उभारला होता. चौकात कार्यकर्त्यांची गर्दी झाल्याने वाहतुकीची कोंडी झाली. दिवसभर येथे तेच चित्र पाहायला मिळाले. चार वाहतूक पोलिस कोंडी नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न करत होते. या कोंडीमुळे इथले मतदान केंद्र बदलून विद्यापीठात नेणार का, असा प्रश्न कार्यकर्त्यांतून उपस्थित करण्यात आला.

| गट | मतदार | मतदान | टक्केवारी |
|---|---|---|---|
| अधिसभा शिक्षक | २९४५ | २७४९ | ९३.३४ |
| विद्यापीठ शिक्षक | १६६ | १६० | ९६.३९ |
| नोंदणीकृत पदवीधर | ३६,३४३ | ११,१३१ | ३०.६३ |
| विद्यापरिषद शिक्षक | ३१११ | २९०८ | ९३.४७ |
| अभ्यास मंडळे | ४३६ | ४२६ | ९७.७१ |



15 NOV 2022


तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात लोकशाहीचा जागर...







कोल्हापूर : सायबर मतदान केंद्रावर मतदारांची झालेली गर्दी. दुसऱ्या छायाचित्रात मतदान केल्याचे चिन्ह दाखवताना कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, निवडणूक अधिकारी तथा कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. तिसऱ्या छायाचित्रात आमदार हसन मुश्रीफ यांनी पदवीधर गटात मतदान केले.

शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांसाठी सोमवारी मतदान झाले. विद्यापीठातील लोकशाहीच्या या जागरात मतदारांसह आघाड्यांच्या नेत्यांनी मतदानाचा हक्क बजावला.
(छाया : रियाज ट्रेनर)





कोल्हापूर : सायबर मतदान केंद्राबाहेरील शिव-शाहू आघाडीच्या बूथवर मतदारांना मार्गदर्शन करताना शिवसेना जिल्हाप्रमुख संजय पवार, शहर समन्वयक हर्षल सुर्वे आदी. दुसऱ्या छायाचित्रात आमदार ऋतुराज पाटील यांनी सायबर कॉलेज मतदान केंद्राला भेट देऊन कार्यकर्त्यांशी चर्चा केली.

15 NOV 2022 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ सिनेटसाठी चुरशीने मतदान

## शिक्षक, नोंदणीकृत पदवीधर, अभ्यास मंडळासाठी सर्वाधिक मतदान; शंभरहून अधिक उमेदवार : उद्या निकाल

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ विविध अधिकार मंडळांसाठी सोमवारी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील ३३ मतदान केंद्रांवर उत्साहात मतदान झाले. १०० हून अधिक उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद झाले आहे. अधिसभा शिक्षक, विद्यापीठ शिक्षक, नोंदणीकृत पदवीधर, अभ्यास मंडळासाठी चुरशीने मतदान झाले. यंदा पदवीधरसाठी तीनपट जास्त नोंदणी होऊनही केवळ ३० टक्केच मतदान झाले. यंदा सरासरी ४० टक्के मतदान झाल्याचे समजते. बुधवारी (दि.१६) सकाळी ८ वाजता विद्यापीठातील परीक्षा भवन येथे मतमोजणी होऊन निकाल जाहीर करण्यात येणार आहे.

विद्यापीठ निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. पदवीधरसाठी ३६ हजार ३४३, तर शिक्षकसाठी ६४० मतदार होते. अधिसभा (३९), विद्यापरिषद (८), तर नऊ अभ्यास मंडळांच्या २७ जागांसाठी निवडणूक होत आहे. शिक्षक गट, विद्यापरिषद आणि अधिकार मंडळावरील वर्चस्वासाठी विकास आघाडी आणि शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) यांच्यात थेट लढत आहे. पदवीधर गटात विकास आघाडी आणि शिव-शाहू आघाडी (शिवसेना ठाकरे गट, सुटा, एसएफआय, यूथ फेडरेशन) यांनी मोट बांधली होती.

शहरातील सायबर कॉलेज, कॉमर्स कॉलेज व श्री शहाजी कॉलेज या केंद्रांवर सकाळी नऊ वाजता मतदानास सुरुवात झाली. विद्यापीठ विकास आघाडी आणि शिव-शाहू आघाडीचे केंद्रांबाहेर बूथ लावण्यात आले होते. त्याठिकाणी मतदारांना त्यांचे मतदान कोणत्या कक्षात आहे, याची माहिती समर्थक देत होते. उमेदवार मतदान केंद्राबाहेर थांबून मतदारांना मतदानाचे आवाहन करत होते.

शिक्षक आणि अभ्यास मंडळे गटात चुरशीने मतदान झाले. सकाळपासूनच शहरातील सर्वच केंद्रांवर विकास आघाडी व शिव-शाहूचे समर्थक, कार्यकर्ते उपस्थित होते. सकाळच्या सत्रात सायबर कॉलेज, शहाजी कॉलेज केंद्रांवर मोठी गर्दी होती. त्यामुळे काहीकाळ वाहतुकीची कोंडी झाली होती. मतदानासाठी रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळाले. सकाळी ११ च्या सुमारास माजी ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी सायबर कॉलेज केंद्रावर मतदानाचा हक्क बजावला. त्यानंतर कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी सायबर कॉलेजवरच रांगेत उभे राहून मतदान केले.

विकास आघाडीच्या वतीने आ. ऋतुराज पाटील, भैया माने, डी. वाय. पाटील ग्रुपचे पृथ्वीराज पाटील, शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख संजय पवार, विजय देवणे यांच्या 'सुटा'चे डॉ. डी. एन. पाटील, डॉ. आर. जी. कोरबू, डॉ. प्रकाश कुंभार, कॉ. गिरीश फोंडे यांच्यासह विविध नेतेमंडळींनी मतदान केंद्रांना भेटी दिल्या. दुपारनंतर मतदान संथगतीने सुरू होते. शेवटी काही मतदार घाईगडबडीने मतदानासाठी येत असल्याचे चित्र होते.



कोल्हापूर : १) श्री शहाजी कॉलेजवर मतदानासाठी लागलेली मतदारांची रांग. २) सायबर कॉलेजवर मतदान केल्याची खूण दाखविताना आ. हसन मुश्रीफ. ३) मतदानाचा हक्क बजावल्यानंतर कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. (छाया : पप्पू अत्तार)

| मतदार संघ | एकूण मतदार | मतदान | टक्केवारी |
|---|---|---|---|
| अधिसभा (शिक्षक) | २९४५ | २७४९ | ९३.३४ टक्के |
| अधिसभा (विद्यापीठ शिक्षक) | १६६ | १६० | ९६.३९ टक्के |
| अधिसभा (नोंदणीकृत पदवीधर) | ३६३४३ | १११३१ | ३०.६३ टक्के |
| अभ्यास मंडळे | ४३६ | ४२६ | ९७.७१ टक्के |

### पदवीधरसाठी कमी; शिक्षक, अभ्यास मंडळासाठी सर्वाधिक मतदान

यंदाच्या निवडणुकीत पदवीधरसाठी तीनपट जास्त नोंदणी झाल्याने मतदानासाठी तरुणाई उत्साहाने मतदान करेल, अशी अपेक्षा होती. प्रत्यक्षात मात्र ३६ हजार ३४३ पैकी फक्त ११ हजार १३१ जणांनी मतदान केले. अधिसभा शिक्षक आणि विद्यापीठ शिक्षक, अभ्यास मंडळासाठी चुरशीने ९० ते ९७ टक्के मतदान झाले.

### निकालानंतर कळणार विद्यापीठावर कोणाचे वर्चस्व

निवडणूक अर्ज प्रक्रियेपासून मतदानापर्यंत तरुण मतदारांमध्ये उत्साह होता. यंदा विद्यापीठ विकास आघाडी व शिव-शाहू, 'सुटा' यांच्यात मतदानासाठी चुरस पाहायला मिळाली. विद्यापीठावर कोणाचे वर्चस्व राहणार हे निकालानंतरच चित्र स्पष्ट होणार आहे.

### शहरातील मतदान केंद्रांवर झालेले गटनिहाय मतदान

#### श्री शहाजी कॉलेज

- अधिसभा (शिक्षक) : २११ पैकी २०३
- अधिसभा (नोंदणीकृत पदवीधर) : ४१०२ पैकी १२०३
- विद्या परिषद (शिक्षक) : २११ पैकी २०३
- अभ्यास मंडळे : २३ पैकी २२

#### कॉमर्स कॉलेज

- अधिसभा (शिक्षक) : ९३ पैकी ८३
- अधिसभा (नोंदणीकृत पदवीधर) : १८६५ पैकी ५६६
- विद्या परिषद (शिक्षक) : ९३ पैकी ८३
- अभ्यास मंडळे : १७ पैकी १६

#### सायबर कॉलेज

- अधिसभा (शिक्षक) : २६३ पैकी २२३
- अधिसभा (विद्यापीठ शिक्षक) : १६६ पैकी १६०
- अधिसभा (नोंदणीकृत पदवीधर) : ११,६९३ पैकी ३७२६
- विद्या परिषद (शिक्षक) : ४२९ पैकी ३८३
- अभ्यास मंडळे : २६ पैकी २५

15 NOV 2022
जनसंपर्क कक्ष
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : सिनेट मतदानासाठी पदवीधर मतदारांनी केलेली गर्दी. (छाया : अर्जुन टाकळकर)

# ‘सिनेट’साठी पदवीधरांमध्ये उत्साह

## शहरातील मतदान केंद्रांवर सकाळपासूनच गर्दी, दिवसभर रांगा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळे सिनेटसाठी मतदारांनी उत्साहात मतदान केले. शहरातील तीन केंद्रांवर मतदान प्रक्रिया झाली. या केंद्रांवर सकाळपासूनच मतदारांच्या रांगा लागल्या होत्या. दोन्ही आघाड्यांनी मतदान केंद्राबाहेर बुथची उभारणी केली होती.

या वर्षी ३६ हजार ३४३ पदवीधरांनी नोंदणी केली होती. सर्वच पक्ष व संघटनांकडून नोंदणीसाठी विशेष प्रयत्न झाले होते. मतदारांना मतदानास आणण्यासाठी चढाओढ सुरू होती. शहरात सायबर महाविद्यालय, कॉमर्स कॉलेज व शहाजी कॉलेज येथे मतदान केंद्रे होती. जिल्ह्यातील २५ हजारांपैकी ११ हजार पदवीधर मतदान हे सायबर कॉलेजमध्ये होते. त्यामुळे दिवसभर या केंद्रावर मतदारांच्या रांगा होत्या. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी सायबर येथे मतदान केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी सायबर येथील मतदान केंद्रात रांगेमध्ये उभा राहून मतदानाचा हक्क बजावला.



मतदान करताना आ. हसन मुश्रीफ

या मतदान केंद्रावर विकास आघाडीचे पृथ्वीराज पाटील यांनी भेट देऊन मतदानाची पाहणी केली, तर शिव-शाहू आघाडीचे संजय पवार, विजय देवणे यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला.

शिव-शाहू आघाडी अंतर्गत शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा), स्टुडंटस् फेडरेशन ऑफ इंडिया, युवासेना (ठाकरे गट), डेमोक्रेटिक यूथ फेडरेशन ऑफ इंडिया यांनी रिंगणात उतरत विकास आघाडीसमोर आव्हान उभे करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे दिवसभर दोन्ही बाजूंच्या कार्यकर्त्यांत उत्साह कायम होता.

15 NOV 2022

तरुण भारत

. जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- १०० उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद
- बुधवारी परीक्षा भवनमध्ये मतमोजणी
- राजकीय नेत्यांसह संस्थाचालक, प्राचार्य, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी बजावला मतदानांचा हक्क

# विद्यापीठ निवडणुकीत चुरशीने मतदान

## अधिसभा विद्यापीठ अभ्यासमंडळात ९९.७१ टक्के सर्वाधिक मतदान : सरासरी ४० टक्के मतदान

**शिवाजी विद्यापीठ विविध अधिकार मंडळासाठी सोमवारी कोल्हापूरसह सांगली आणि सातारा जिल्ह्यातील ३३ मतदान केंद्रावर चुरशीने व मतदान झाले. तीन जिल्ह्यात ४३०१ मतदार होते त्यापैकी १७३७४ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. सर्व गटात सरासरी ४० टक्के मतदान झाले असून, एकूण ५० जागांसाठी रिंगणात असलेल्या १०० उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद झाले. पदवीधरसाठी तीन पटीने नोंदणी झाली असली तरी प्रत्यक्षात ३० टक्के मतदान झाले. बुधवार १६ नोव्हेंबर रोजी परीक्षा भवन येथे मतमोजणी होणार आहे. विविध अधिकार मंडळावर विद्यापीठ विकास आघाडी आणि शिव-शाहू आघाडीत रस्सीखेच होणार आहे.**





**कोल्हापूर : आमदार ऋतुराज पाटील यांनी सायबर कॉलेज मतदान केंद्राला भेट देवून कार्यकर्त्यांशी चर्चा केली. दुसऱ्या छायाचित्रात सायबर कॉलेज मतदान केंद्रावर मतदान केल्याची खून दाखवताना सुटाचे प्रमुख कार्यवाह डॉ. डी. एन. पाटील, डॉ. प्रकाश कुंभार, शिवाजी पोवार, अशोक कोरडे.**

प्रतिनिधी
कोल्हापूर

शहरातील सायबर कॉलेज, शहाजी कॉलेज, कॉमर्स कॉलेज या तीन मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया पार पडली. प्रत्येक मतदान केंद्रावर विद्यापीठ प्रशासनाची यंत्रणा मतदान प्रक्रियेत सक्रीय होती. सायबर मतदान केंद्रावर माजी कामगार मंत्री हसन मुश्रीफ, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, निवडणूक निर्णय अधिकारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी मतदानाचा हक्क बजावला. आमदार ऋतुराज पाटील, डी. वाय. पाटील प्रतिष्ठानचे विश्वस्त पृथ्वीराज पाटील, जिल्हा बँकेचे संचालक प्रताप उर्फ भैया माने, शिवसेना जिल्हाप्रमुख संजय पवार, शिवसेना जिल्हाप्रमुख विजय देवणे, सुटाचे प्रमुख कार्यवाह डॉ. डी. एन. पाटील यांनी सायबर कॉलेज, कॉमर्स कॉलेज, शहाजी कॉलेज या मतदान केंद्रांना सदिच्छा भेट देत उमेदवार आणि मतदारांशी चर्चा केली. यंदा पदवीधरमध्ये मतदार संख्या जास्त असली तरी प्रत्यक्ष मतदान मात्र कमी झाल्याचे चित्र आहे. दुपारपर्यंत मतदान केंद्रावर मतदारांची गर्दी होती. तर दुपारी चार नंतर सर्वच मतदान केंद्रावर तुरळक गर्दी होती. काहींनी अखेरच्या टप्प्यात मतदान केले. मतदान केंद्रावर नोंदणीकृत पदवीधर, विद्या परिषद, शिक्षक, अभ्यासमंडळ गटातील उमेदवार अन संघटनेचे नेते दिवसभर फिरत होते.

### उद्या मतमोजणी

शिवाजी विद्यापीठातील परीक्षा भवनमध्ये बुधवारी सकाळी ९ वाजता मतमोजणीला सुरुवात होणार आहे. विद्यापीठ प्रशासनाने मतमोजणीची जय्यत तयारी केली आहे.

### आघाडीच्या नेत्यांनी मांडला मतदान केंद्रांवर ठिय्या

मतदार नोंदणीपासून ते मतदान केंद्रावर मतदाराला आणण्यापर्यंतची जबाबदारी त्या त्या संघटनेची होती. त्यामुळे विद्यापीठ विकास आघाडी व विद्यापीठ विकास मंच, सुटा व शिव-शाहू आघाडीच्या नेत्यांनी मतदान केंद्रांवर ठिय्या मांडला होता.



### कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील गटनिहाय मतदान

| मतदार संघ | एकूण मतदान | झालेले मतदान | टक्केवारी |
|---|---|---|---|
| अधिसभा शिक्षक : | २९४५ | २७४९ | ९३.३४ |
| अधिसभा विद्यापीठ शिक्षक : | १६६ | १६० | ९६.३९ |
| अधिसभा नोंदणीकृत पदवीधर: | ३६३४३ | ११९३१ | ३०.३९ |
| विद्यापरिषद शिक्षक: | ३१११ | २९०८ | ९३.४७ |
| अभ्यास मंडळे : | ४३६ | ४२६ | ९७.७१ |

### सायबर कॉलेज गटनिहाय मतदान

| | |
|---|---|
| अधिसभा शिक्षक | २६३ पैकी २२३ |
| अधिसभा विद्यापीठ शिक्षक | १६६ पैकी १६० |
| अधिसभा नोंदणीकृत पदवीधर | ११६९३ पैकी ३७२६ |
| विद्यापरिषद शिक्षक | ४२९ पैकी ३८३ |
| अभ्यास मंडळे | २६ पैकी २५ |

### शहाजी कॉलेज गटनिहाय मतदान

| | |
|---|---|
| अधिसभा शिक्षक | २११ पैकी २०३ |
| अधिसभा नोंदणीकृत पदवीधर | ४१०२ पैकी १२०३ |
| विद्यापरिषद शिक्षक | २११ पैकी २०३ |
| अभ्यास मंडळे | २३ पैकी २२ |

### कॉमर्स कॉलेज गटनिहाय मतदान

| | |
|---|---|
| अधिसभा शिक्षक | ९३ पैकी ८३ |
| अधिसभा नोंदणीकृत पदवीधर | १८६५ पैकी ५६६ |
| विद्यापरिषद शिक्षक | ९३ पैकी ८३ |
| अभ्यास मंडळे | १७ पैकी १६ |

15 NOV 2022

जनसंपर्क कक्ष

सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ३३ केंद्रांवर मतदान सुरळीत

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १४ : शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीसाठी आज शांततापूर्ण वातावरणात मतदान झाले. कोल्हापूरसह सांगली, साताऱ्यातील ३३ केंद्रांवर मतदान प्रक्रिया सुरळीत झाली. दरम्यान, निवडणुकीचा कौल कोणाच्या बाजूने लागणार, याची उत्सुकता आहे. मतदानानंतर दोन्ही आघाड्यांनी मतदानाची आकडेमोड केली. बुधवारी (ता. १६) सकाळी आठ वाजता मतमोजणीस सुरुवात होईल.

शहरातील छत्रपती शाहू इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस एज्युकेशन अँड रिसर्च (सायबर), शहाजी छत्रपती महाविद्यालय व देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स येथे मतदान केंद्रे होती. या केंद्रांवर सकाळपासूनच उमेदवारांसह शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी व शिव-शाहू आघाडीअंतर्गत युवा सेना (ठाकरे गट), शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा), स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया, डेमोक्रॅटिक यूथ फेडरेशन ऑफ इंडियाचे कार्यकर्ते उमेदवारांसोबत होते. सकाळी आठ वाजता मतदान प्रक्रियेस सुरवात झाली. त्यानंतर हळूहळू मतदान केंद्रांवर मतदार येऊ लागले. सायबर चौकात विकास आघाडी व शिव-शाहू आघाडीने शामियाना उभारला होता. तेथे कार्यकर्त्यांची गर्दी होती. येणाऱ्या मतदारांची नावे शोधून त्यांना बूथचा क्रमांक सांगण्यात येत होता. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी मतदानाचा हक्क बजावला. दोन्ही आघाड्यांतील उमेदवारांसह कार्यकर्त्यांनी त्यांची भेट घेतली.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ सिनेट सदस्यांसाठी सोमवारी मतदान झाले. सायबर कॉलेजमध्ये मतदार आणि पाठीराख्यांची गर्दी झाली होती.

## सायबरमध्ये मतदानासाठी रांगा

सायबरमध्ये ११ हजार ६९३ मतदान होते. येथे मतदानासाठी दहा बूथ होते. मतदानाचा आकडा जादा असल्याने केंद्रावर मतदानासाठी रांगा लागल्या होत्या. दुपारी तीनपर्यंत सायबर चौकात कार्यकर्ते थांबून होते. आमदार हसन मुश्रीफ, आमदार ऋतुराज पाटील, पृथ्वीराज पाटील यांनी केंद्रांवर जाऊन उमेदवारांच्या भेटी घेतल्या.

## सेनेच्या कार्यकर्त्यांत उत्साह

शहाजी छत्रपती महाविद्यालयाच्या केंद्राच्या परिसरात दोन्ही आघाड्यांचे कार्यकर्ते ठाण मांडून होते. यंदा शिव-शाहू आघाडीची स्थापना झाल्याने सेनेच्या कार्यकर्त्यांत उत्साह होता. युवा सेना प्रथमच निवडणुकीत उतरली होती. निवडणूक प्रक्रिया समजून घेत त्यांनी उमेदवारांचा जोरदार प्रचार केला. आज कार्यकर्ते बूथवर दिवसभर थांबून होते. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख संजय पवार, विजय देवणे, हर्षल सुर्वे, मंजित माने यांनी केंद्रांवर हजेरी लावली होती.

Times of India

# SUK's senate election held

**Kolhapur:** Roughly 35% of the registered graduates and 85% professors from Kolhapur, Sangli and Satara came to vote on Monday to elect their new representatives in the Shivaji University's senate, the highest decision-making body of the university. PTI

लोकसत्ता

# शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा निवडणुकीसाठी चुरशीने मतदान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा निवडणुकीसाठी सोमवारी तीन जिल्ह्यात ९३ टक्क्याहून अधिक मतदान झाले. सर्वाधिक मतदान असलेल्या नोंदणीकृत पदवीधर विभागात केवळ ३० टक्के मतदान झाले. अधिसभा अंतर्गत शिक्षक, विद्यापीठ शिक्षक व नोंदणीकृत पदवीधर तसेच विद्या परिषदेच्या शिक्षक व अभ्यास मंडळे या जागांसाठी आज कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील ३३ मतदान केंद्रांवर सुरळीत मतदान झाले.

15 NOV 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कृषी क्षेत्राला शाश्वत आर्थिक स्थैर्याची गरज

## केंद्रीय सचिव डॉ. अशोक दलवाई यांचे प्रतिपादन : 'कृषी विपणन' विषयावर मार्गदर्शन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

कृषीक्षेत्रात प्रभावी विपणनाचा (वस्तूंची विक्री) अवलंब करून शेतकऱ्यांना लाभ द्यावयाचा झाल्यास शाश्वत पर्यावरणाबरोबरच त्यांना शाश्वत आर्थिक स्थैर्य प्रदान करण्यालाही प्राधान्य द्यायला हवे, असे प्रतिपादन भारत सरकारचे केंद्रीय सचिव तथा राष्ट्रीय पर्जन्यसिंचित क्षेत्र प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अशोक दलवाई यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा अर्थशास्त्र अधिविभाग आणि हैदराबाद येथील दि इंडियन सोसायटी ऑफ ॲग्रीकल्चरल मार्केटिंग (आयएसएएम) यांच्या संयुक्त विद्यमाने 'कृषी विपणन (वस्तू खरेदी)" या विषयावर आयोजित राष्ट्रीय परिषदेच्या उद्‌घाटनप्रसंगी बीजभाषण करताना ते बोलत होते. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते उद्‌घाटन केले.

डॉ. दलवाई म्हणाले, कृषी क्षेत्रात विपणन ही एकल खरेदी-विक्रीची क्रिया नसून ती बहुस्तरित पद्धत आहे, हे लक्षात घेऊन नियोजन करायला हवे. कृषी व्यवसायात नफा वाढवणे आणि तोटा कमी करणे अभिप्रेत असते. शेती मूलभूत व्यवसायाला फायद्यात आणून शाश्वत बनली पाहिजे. उत्पादनाची योग्य साठवण, वाहतूक आणि वितरण व्यवस्था केल्यास समस्येचे रुपांतर संधीत करता येईल. नव-डिजीटल तंत्रज्ञानात सेन्सर तंत्रज्ञान, रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता आदींचा समावेश आहे. तंत्रज्ञान नव-रोजगार निर्मितीस चालना देत असेल तर लाभदायी ठरेल. जागतिक स्तरावर जर 'वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन"सारखी एकात्मिक व्यवस्था उभी राहात असेल, तर भारतासारख्या देशात 'सिंगल नेशन, सिंगल मार्केट' सहज उभे राहू शकते.

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या माजी डेप्युटी गव्हर्नर उषा थोरात म्हणाल्या, शाश्वत पर्यावरणीय विकासाला सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे. शेतकऱ्यांच्या दृष्टीने पाणी व ऊर्जास्रोतांचे नियोजन व व्यवस्थापन करून, कृषीउत्पादनावर विपरित परिणाम करणाऱ्या खतांचा वापर करू नये.

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, देशातील शेतकऱ्यांपर्यंत या परिषदेतील मंथनाचा लाभ मिळवून देण्याचे प्रयत्न व्हावेत. 'आयएसएएम"चे अध्यक्ष डॉ. एस. महेंद्र देव म्हणाले, कृषीत नवतंत्रज्ञानाच्या आधारे आधुनिकीकरण आवश्यक आहे. 'आयएसएएम"चे सचिव डॉ. टी. सत्यनारायणा यांनी संस्थेच्या ३६ वर्षांच्या वाटचालीचा माहिती दिली. परिषदेचे समन्वयक डॉ. ज्ञानदेव तळुले यांनी यावेळी प्रास्ताविक केले. अर्थशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. विद्या कट्टी यांनी आभार मानले.

यावेळी नाबार्डचे मुख्य सरव्यवस्थापक डॉ. सत्यसाई, जागतिक बँकेचे अर्थतज्ज्ञ डॉ. चंद्रशेखर रानडे, महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू, केरळ, पश्चिम बंगाल, ओरिसा, मेघालय, उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेश, तेलंगणा, गुजरात, दिल्ली यांसह अनेक राज्यांतून ६० हून अधिक शोधनिबंध सादर होणार आहेत.



**कोल्हापूर : राष्ट्रीय परिषदेचे दीपप्रज्वलन करताना उषा थोरात. सोबत डॉ. ज्ञानदेव तळुले, डॉ. एस. महेंद्र देव, डॉ. अशोक दलवाई, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आदी.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी

# कृषी क्षेत्राला शाश्वत आर्थिक स्थैर्याची गरज

## ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. अशोक दलवाई; विद्यापीठात राष्ट्रीय कृषी विपणन परिषदेस प्रारंभ



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित तीन दिवसीय कृषी विपणन राष्ट्रीय परिषदेस मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने प्रारंभ झाला. यावेळी डावीकडून डॉ. ज्ञानदेव तळुले, डॉ. एस. महेंद्र देव, डॉ. अशोक दलवाई, उषा थोरात, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.**

### परिषदेत तीन संकल्पनांवर होणार मंथन

राष्ट्रीय परिषदेत कृषी विपणनात तंत्रज्ञानाची भूमिका, पशुधन व पशुधन उत्पादन विपणन आणि महाराष्ट्रातील कृषी विपणनात सरकारची भूमिका या तीन प्रमुख संकल्पनांवर मंथन होणार आहे. महाराष्ट्रासह अनेक राज्यांतून ६० हून अधिक शोधनिबंध परिषदेत सादर केले जाणार आहेत.

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कृषी क्षेत्रात प्रभावी विपणनाचा अवलंब करून शेतकऱ्यांना लाभ द्यावयाचा झाल्यास शाश्वत पर्यावरणाबरोबरच त्यांना शाश्वत आर्थिक स्थैर्य प्रदान करण्यास प्राधान्य द्यायला हवे, असे प्रतिपादन भारत सरकारचे केंद्रीय सचिव तथा राष्ट्रीय पर्जन्यसिंचित क्षेत्र प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी व ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. अशोक दलवाई यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा अर्थशास्त्र अधिविभाग व हैदराबाद येथील दि इंडियन सोसायटी ऑफ अॅग्रीकल्चरल मार्केटिंग (आयएसएएम) यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी विपणन विषयावर आयोजित तीन दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन समारंभात परिषदेचे बीजभाषण करताना ते बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित होते.

डॉ. दलवाई म्हणाले, शेती मूलभूत व्यवसाय असल्याने त्यामध्ये स्पर्धात्मक व प्रोत्साहनात्मक वातावरण निर्मिती महत्त्वाची ठरते. या व्यवसायाला फायद्यात आणून शाश्वत बनवायचे तर त्याचे उत्पादन भरीव व चांगले मिळणे आवश्यक असते. त्याचबरोबर त्याची खरी किंमतही नफ्यासह मिळायला हवी. म्हणून येथे विपणनाच्या पद्धती अवलंबायला हव्यात. विपणनाबरोबरच शेतकऱ्यांची आर्थिक सक्षमता वृद्धिंगत होऊन त्याच्या राहणीमानास स्थैर्य प्रदान करण्यासाठी नवनवीन मार्ग शोधण्याची व कृषी अन् प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन देऊन रोजगार संधी विकसित करण्याची गरज आहे. नवडिजिटल तंत्रज्ञान हे विध्वंसक आहे. संगणकाप्रमाणे हे तंत्रज्ञान नवरोजगार निर्मितीस चालना देत असेल तर लाभदायी ठरेल. उपलब्ध रोजगार त्यामुळे प्रभावित होत असतील तर मात्र त्यांचा फेरविचार करावा लागेल.

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या माजी डेप्युटी गव्हर्नर उषा थोरात म्हणाल्या, शाश्वत पर्यावरणीय विकासास सर्वोच्च प्राधान्य देण्याची गरज आहे. त्यातून शेती व शेतकऱ्याचे शाश्वत जगणे विकसित व्हायला हवे. त्या दृष्टीने पाणी व ऊर्जास्रोतांचे काटेकोर नियोजन व व्यवस्थापन, शाश्वत कृषी उत्पादनावर विपरीत परिणाम करणारी खते, कीटकनाशके, हरितगृह वायू आदींचे निर्मूलन, राष्ट्रीय व स्थानिक पातळीवर पीक पद्धतीचे नियोजन आणि जागतिक स्तरावर होत असणाऱ्या व्यापार विस्थापन व बदल यांचा शेतकऱ्यांना लाभ कसा मिळवून द्यायचा, या दृष्टीने परिषदेत विचार केला जावा.

आयएसएएमचे अध्यक्ष डॉ. एस. महेंद्र देव म्हणाले, कृषी विपणनाच्या क्षेत्रात नवतंत्रज्ञानाच्या आधारे आधुनिकीकरण आवश्यक आहे. कृषी उत्पादन अधिक काळ ताजे व टिकाऊ राहण्यासाठी पॅकिंग, साठवण, वाहतूक, वितरण या प्रणालींमध्ये आवश्यक ते बदल करायला हवेत.

आयएसएएमचे सचिव डॉ. टी. सत्यनारायणा यांनी संस्थेच्या वाटचालीचा गोषवारा सादर केला. यावेळी नाबार्डचे मुख्य सरव्यवस्थापक डॉ. सत्यसाई, जागतिक बँकेचे अर्थतज्ज्ञ डॉ. चंद्रशेखर रानडे यांच्यासह अनेक अर्थतज्ज्ञ, शिक्षक, संशोधक उपस्थित होते. परिषदेचे समन्वयक डॉ. ज्ञानदेव तळुले यांनी यावेळी प्रास्ताविक केले. अर्थशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. विद्या कट्टी यांनी आभार मानले.

15 NOV 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कृषीक्षेत्रात प्रभावी विपणनाचा अवलंब करा

## ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. अशोक दलवाई; विद्यापीठात तीनदिवसीय राष्ट्रीय परिषदेला प्रारंभ

कोल्हापूर, ता. १४ : कृषीक्षेत्रात प्रभावी विपणनाचा अवलंब करून शेतकऱ्यांना लाभ द्यायचा झाल्यास शाश्वत पर्यावरणासह शाश्वत आर्थिक स्थैर्य देण्यास प्राधान्य द्यायला हवे, असे प्रतिपादन भारत सरकारचे केंद्रीय सचिव व ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. अशोक दलवाई यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचा अर्थशास्त्र अधिविभाग व हैदराबादच्या दि इंडियन सोसायटी ऑफ ॲग्रीकल्चरल मार्केटिंग (आयएसएएम) यांच्या संयुक्त विद्यमाने 'कृषी विपणन' विषयावर आयोजित तीनदिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के



**कोल्हापूर : कृषी विपणन राष्ट्रीय परिषदेत बोलताना ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. अशोक दलवाई.**



उपस्थित होते. राजर्षी शाहू सभागृहात परिषदेचे आयोजन केले आहे.

डॉ. दलवाई म्हणाले, ''कृषी क्षेत्रात विपणन एकल खरेदी-विक्रीची क्रिया नसून ती बहुस्तरीय पद्धती आहे, हे लक्षात घेऊन नियोजन करायला हवे. कृषी व्यवसाय आहे. व्यवसाय म्हटला की, त्यात नफा वाढवत जाणे आणि तोटा कमी करीत जाणे अभिप्रेत असते. अन्यथा दुकान बंद करावे लागते. या व्यवसायाला फायद्यात आणून शाश्वत बनवावयाचे तर त्याचे उत्पादन भरीव आणि चांगले मिळणे आवश्यक असते. त्याची खरी किंमतही नफ्यासह मिळायला हवी. म्हणून येथे विपणनाच्या पद्धती अवलंबायला हव्यात. कृषी क्षेत्राशी निगडित व्यवस्थांचे सुसूत्रीकरण आजघडीला महत्त्वाचे आहे.''

ते म्हणाले, ''विपणनाबरोबरच शेतकऱ्यांची आर्थिक सक्षमता वृद्धिंगत होण्यासाठी नवनवीन मार्ग शोधण्याची तसेच कृषी-अन्नप्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन देऊन रोजगार संधी विकसित करण्याची गरज आहे. नवडिजिटल तंत्रज्ञान डिसरप्टिव्ह (विध्वंसक) आहे. त्यात सेन्सर तंत्रज्ञान, रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा समावेश आहे. तथापि, संगणकाप्रमाणे हे तंत्रज्ञान नवरोजगार निर्मितीस चालना देत असेल तर लाभदायी ठरेल. उपलब्ध रोजगार त्यामुळे प्रभावित होत असतील, तर मात्र त्यांचा फेरविचार करावा लागेल.'' भारतीय रिझर्व्ह बँकेच्या माजी डेप्युटी गव्हर्नर उषा थोरात म्हणाल्या, ''शाश्वत पर्यावरणीय विकास या बाबीला सर्वोच्च प्राधान्य देण्याची गरज आहे. त्यातून शेती व शेतकऱ्याचे शाश्वत जगणे विकसित व्हायला हवे.''

'आयएसएएम'चे अध्यक्ष डॉ. एस. महेंद्र देव यांनी कृषी विपणनाच्या क्षेत्रात नवतंत्रज्ञानाच्या आधारे आधुनिकीकरण आवश्यक असल्याचे स्पष्ट केले.

यावेळी 'आयएसएएम'चे सचिव डॉ. टी. सत्यनारायणा, नाबार्डचे मुख्य सरव्यवस्थापक डॉ. सत्यसाई, जागतिक बँकेचे अर्थतज्ज्ञ डॉ. चंद्रशेखर रानडे उपस्थित होते. परिषदेचे समन्वयक डॉ. ज्ञानदेव तळुले यांनी प्रास्ताविक केले. अर्थशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. विद्या कट्टी यांनी आभार मानले.

लोकमत

# विद्यापीठात पंडित नेहरू यांना अभिवादन

कोल्हापूर : स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती शिवाजी विद्यापीठात सोमवारी उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात सकाळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते पंडित नेहरू यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, नेहरू अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रल्हाद माने, आदी उपस्थित होते.


लोकमत

# कोल्हापूरच्या अवकाशात दिसले अवकाश स्थानक

संदीप आडनाईक

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : खगोलशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या आणि अवकाशाबद्दल जिज्ञासा असणाऱ्यांनी अवकाशातील अनेक खगोलीय घटना पाहिल्या असतील, परंतु सोमवारी आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानक तब्बल सात मिनिटे कोल्हापूरच्या अवकाशात दर्शन उघड्या डोळ्यांनी घेण्याची संधी मिळाली. चंद्राच्या जवळून प्रवास करताना हे अवकाशस्थानक सोमवारी ६ वाजून २६ मिनिटांनी कोल्हापूरच्या अवकाशात दक्षिण-पूर्वे दिशेकडून उत्तरेच्या दिशेला पृथ्वीवरून सरासरी ६२ अंश डिग्री इतक्या उंचीवर दिसले. या स्थानकाचा वेग प्रचंड असतो, त्यामुळे अल्पकाळ दिसते. शहराभोवतीचा प्रखर प्रकाश, प्रदूषण आणि ढगाळ हवामानामुळे अनेकांना हे स्थानक दिसले नाही.



(संग्रहित आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानक)

हे स्थानक सूर्य उगवण्याच्या काही क्षणातच आढळून येते. सूर्याचा प्रकाश या स्थानकाच्या सोलरपॅनेलवरून परावर्तित होताच ते चमकते आणि त्याचे दर्शन होते. रविवारी आणि सोमवारीही अनेक खगोल अभ्यासकांनी हे स्थानक सात मिनिटांच्या आसपास प्रत्यक्षात पाहिले. कळंबा, पुईखडी भागातील उंच टेकडीवरून त्याचे चांगले दर्शन होईल.

**- प्रा. डॉ. राजीव व्हटकर,**
समन्वयक, अवकाश संशोधन केंद्र,
शिवाजी विद्यापीठ

## कोल्हापूरकरांना आज, उद्या पुन्हा पाहता येईल स्थानक

आज दि. १५, आणि १६ नोव्हेंबर रोजी हे अवकाश स्थानक पुन्हा कोल्हापूरच्या अवकाशात पाहायला मिळेल. पश्चिमेकडून उत्तरेकडच्या दिशेला. आज, मंगळवारी दि. १५ रोजी पहाटे ४.२४ मिनिटांनी १० अंश डिग्री कोनातून, तर सायंकाळी ७. १६ मिनिटांनी ३ मिनिटांसाठी क्षितिजापासून १२ अंश डिग्री कोनात दिसेल. याशिवाय बुधवार, दि. १६ मे रोजी १५ डिग्री अंशातून सायंकाळी ६ वाजून २६ मिनिटांनी जास्तीत जास्त काळ म्हणजे, सहा मिनिटांसाठी हे स्थानक दिसू शकेल. अर्थात हे स्थानक क्षितिजाच्या अगदी जवळून जाणार असल्यामुळे कमी कालावधीसाठी दिसणार आहे. हे स्थानक दक्षिण-पश्चिम दिशेतून वर येताना दिसेल.

पुढारी

# पंडित नेहरू यांना जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती शिवाजी विद्यापीठात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते पंडित नेहरू यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
15 NOV 2022
पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नोंदणीकृत पदवीधरमध्ये ३१ टक्के मतदान

## शिवाजी विद्यापीठ सिनेट निवडणूक

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या अधिकार मंडळांच्या (सिनेट) नोंदणीकृत पदवीधर गटासाठी ३०.६३ टक्के मतदान झाले. या वर्षी मोठ्या उत्साहात ३६ हजार ३४३ इतक्या पदवीधरांनी नोंदणी केली होती. त्यामुळे या गटातील मतदानाकडे दोन्ही आघाड्यांचे लक्ष होते. या गटातील अधिकाधिक मतदान होण्यासाठी दोन्ही बाजूंनी प्रयत्न करण्यात येत होते. मतमोजणी बुधवार, दि. १६ रोजी होणार आहे.

**झालेले मतदान**

| मतदारसंघ | एकूण मतदान | झालेले मतदान | टक्केवारी |
|---|---|---|---|
| अधिसभा शिक्षक | २९४५ | २७४९ | ९३.३४ |
| अधिसभा विद्यापीठ शिक्षक : | १६६ | १६० | ९६.३९ |
| अधिसभा नोंदणीकृत पदवीधर : | ३६३४३ | ११९३१ | ३०.६३ |
| विद्या परिषद शिक्षक : | ३१११ | २९०८ | ९३.४७ |
| अभ्यास मंडळे : | ४३६ | ४२६ | ९७.७१ |

मोठ्या संख्येने पदवीधर गटासाठी झालेली नोंदणी हे या सिनेट निवडणुकीतील वैशिष्ट्य ठरले. मोठ्या उत्साहात नोंदणी झाली असली तरी मतदानावेळी मात्र मतदारांमध्ये निरुत्साह दिसून आला. त्याउलट अधिसभेचा शिक्षक गट, अधिसभेचा विद्यापीठ शिक्षक गट, विद्या परिषद शिक्षक, अभ्यास मंडळे या गटांची टक्केवारी अधिक होती. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांत ३३ केंद्रांवर मतदान प्रक्रीया पार पडली. शहरातील ▶▶ पान ५ वर...

## नोंदणीकृत पदवीधरमध्ये ३१ टक्के मतदान

**(पान १ वरून)** सायबर कॉलेजमधील मतदान केंद्र व केंद्राबाहेर दिवसभर मोठी गर्दी होती. त्यामुळे या परिसरात दिवसभर वाहतूक कोंडी होती. त्यामुळे सायबरऐवजी विद्यापीठ परिसरामध्ये मतदान केंद्र असावे, अशी भावना अनेकांनी व्यक्त केली. कोल्हापूरमध्ये शहाजी महाविद्यालय, कॉमर्स कॉलेज आणि सायबर कॉलेज या तीन केंद्रांवर मतदान पार पडले. यापैकी सायबर कॉलेज केंद्रावर दिवसभर मतदार व कार्यकर्त्यांची गर्दी होती. या तीन केंद्रांवर एकूण ३१ टक्के इतके मतदान झाले.

सकाळ

## शिवाजी विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात कार्यक्रम झाला. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पंडित नेहरू यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, नेहरू अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रल्हाद माने उपस्थित होते.